कला संचालक, महाराष्ट्र ललित कला शिक्षण सेवा, वर्ग-अ (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ संदर्भात स्पष्टता.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : एडीआर-२०१४/प्र.क्र.१३६/तांशि-६
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक:- ०१ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, अधिसूचना क्रमांक एडीआर २०१०/(१५५/१०)/तांशि-६ दिनांक ७ जून,२०१४.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, अधिसूचना क्रमांक एडीआर २०१०/(१५५/१०)/तांशि-६ दिनांक २१ ऑक्टोबर,२०१६.
३) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. आरटीआर १०७९/११६०-XII, दिनांक १८ जुलै,१९७९.

प्रस्तावना:-

संचालक, कला संचालनालय या पदाकरिता दिनांक ७ जून, २०१४ च्या अधिसूचनेद्वारे सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत. तसेच, सदर नियमांमध्ये दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६ च्या अधिसूचनेद्वारे सुधारणा करण्यात आली आहे. सदर सेवाप्रवेश नियमातील नियम क्र.२ (अ)(i)(३) अन्वये संचालक, कला संचालनालय या पदाकरिता " उमेदवारास शासनमान्य कला संस्थेतील अध्यापनाचा किंवा शासन मान्य कला संस्थेतील प्रशासकीय कामाचा १७ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या वर्षाचा एकत्रित (collective) किंवा अपवर्जक (exclusive) अनुभव असावा," अशी अर्हता निश्चीत करण्यात आली आहे. तथापि, सदरचा अनुभव हा शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचा असावा किंवा कसे हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. या अनुषंगाने सदर नियमाबाबत स्पष्टीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

या शासन निर्णयान्वये असे आदेश देण्यात येत आहेत की, कला संचालक, महाराष्ट्र ललित कला शिक्षण सेवा, वर्ग-अ (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम,२०१६ चा नियम क्र. २ (अ)(i)(३) मधील " उमेदवारास शासनमान्य कला संस्थेतील अध्यापनाचा किंवा शासन मान्य कला संस्थेतील प्रशासकीय कामाचा १७ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या वर्षाचा एकत्रित किंवा अपवर्जक अनुभव असावा," या तरतुदीच्या अनुषंगाने सदर "अनुभव" विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर किंवा शैक्षणिक अर्हता धारण करण्याच्या कालावधीत प्राप्त केला तरी तो अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.

कला संचालक या पदाच्या सेवाप्रवेश नियमात वरील आशयाची सुधारणा करण्याची कार्यवाही यथावकाश करण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०८०११७०९२९७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Rajaram Utekar

Digitally signed by Sandesh Rajaram Utekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=009789e9fe23fde06096381e43bebecd32b5c692c899745eee7d89d805005a87, cn=Sandesh Rajaram Utekar
Date: 2019.08.01 17:14:42 +05'30'

(सं. रा. उतेकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक, कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
७) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९) निरिक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई.
१०)सहायक निरिक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई, औरंगाबाद व नागपूर.
११) निवड नस्ती, कार्यासन तांशि-६.